# हैद्राबादचा मुक्तिलढा

**श्री. विकास विलासराव शिंदे**
**(सहाय्यक प्राध्यापक)**
**माऊली महाविद्यालय, वडाळा ता.उ. सोलापूर जि. सोलापूर.**



## हैद्राबादचा मुक्तिलढा :-

ब्रिटिश या युरोपियन व्यापाऱ्यांनी भारतीयांची मानसिकता ओळखल्यांनतर आक्रमक धोरणाचा अवलंब केला. स्थानिक सत्ताधिशांशी आधुनिक शास्त्रानिशी लढा देऊन सन १७५० ते १८५७ पर्यंत भारतातील बहुंताशी संस्थाने काबीज करुन संस्थानी राज्यकारभारात हस्तक्षेप केला. संस्थानीकांच्या प्रभावाखाली असली तरी खरी सत्ता ब्रिटीशांच्याच ताब्यात होती. ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य दिले तेव्हा भारतात एकूण ५६५ संस्थाने होती. त्यापैकीच एक संस्थान म्हणजे हैद्राबाद. या संस्थानावर निजामाची अनियंत्रित सरजामी संत्ता होती. कासीम रिझवी व त्याचा रजाकार संघटनेने निजामाची सत्ता टिकण्यासाठी २ लाख रजाकारासह संस्थानात धुमाकुळ घातला होता. रजाकाळ लुट, बलात्कार, खुन आणि जनतेची मालमत्ता जाळपोळ करत होते. म्हणूनच भारतीय जनता जेव्हा ब्रिटिशांच्या जोखाडातून मुक्त होण्याचा प्रयत्न करीत होती. तेव्हा हैद्राबाद संस्थानातील जनता निजामाच्या जोखाडातून मुक्त होण्याचा प्रयत्न करीत होती. हैद्राबाद संस्थानातील जनता निजामाच्या जोखडात तर निजाम ब्रिटिश राजेशाहीच्या जोखडात म्हणजेच एका अर्थाने हैद्राबाद संस्थानातील जनता दुहेरी गुलामगिरीत होती. हैद्राबाद संस्थान निजामाच्या वर्चस्वातून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात सामिल झाले. त्यालाच आधुनिक भारताच्या इतिहासात हैद्राबाद मुक्तीलढा असे म्हणतात.

## ब्रिटिशांची संस्थानाविषयी भूमिका :-

सन १८५७ च्या उठावात संस्थानिक भारतीयांच्या बाजूने सामील न झाल्याने ब्रिटिशांनी सन १८५८ नंतर संस्थाने खालसा करण्याचे धोरण सोडून दिले असले तरी संस्थांनिकाचे सार्वभौमत्वाचे अधिकार ब्रिटिश राजसत्तेने काढून घेतले. राष्ट्रीय कॉग्रेसच्या संस्थानाचा वापर ब्रिटिशांनी राष्ट्रीय आंदोलनल शह देण्यासाठी करण्याचे ठरविले. त्यानुसार पहिल्या जागतिक महायुध्दात संस्थानिंकांनी ब्रिटिशांना सहकार्य केले. तसेच राष्ट्रीय आंदोलनाला दडपून टाकण्यासाठीच संस्थानिकांचे नरेश मंडळ स्थापन करण्यात आले. या मंडळात सामील होणे बंधनकारक नसल्याने हैद्राबाद संस्थान या मंडळात सामील झाले नाही. तर पुढे सन १९४६ मध्ये भारतीय संस्थाने घटनासमितीत सामील न झाल्यास भारताची स्वातंत्र्यांच्या दिशेने चाललेली घोडदौड थांबविण्याचा ब्रिटिशांचा प्रयत्न होता.

## हैद्राबाद संस्थानाचे स्वरुप :-

२० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेब बादशहाचा दक्षिणेत मृत्यू झाल्यानंतर मुघल साम्राज्याच्या विघटनास सुरुवात झाली. पुढे मुघल बादशहा मुहम्मदशहाच्या कारकिर्दित सन १७२४ मध्ये असाफिया घराण्यातील निजाम-उल-मुल्कने आपले स्वातंत्र्य घोषीत केले. सन १७२४ ते १९४८ या एकूण कालखंडात ७ निजाम होऊन गेले. त्यापैकी सन १९११ ते १९४८ या काळात मीर उस्मानअली खान हा हैद्राबाद राज्यात सत्तेवर होता. तो अत्यंत महत्वाकांक्षी, हटटी आणि कुशाग्र बुध्दीचा होता. हैद्राबाद संस्थानाचे एकूण क्षेत्रफळ ८२३१४ चौरस मैल होते तर सन १९४१ च्या जनगणनेनुसार १६३३८००० लोकसंख्या होती. या संस्थानात तेलगू भाषिक ९, कानडी भाषिक ३ आणि मराठी भाषिक (मराठवाडा) ५ जिल्हयांचा समावेश होता. या एकूण लोकसंख्येत हिंदु ८५ टक्के, मुस्लिम ११ टक्के आणि इतर अल्पसंख्याक ४ टक्के होते. हैद्राबाद संस्थानातील रेल्वे, पोस्ट, टेलिग्राम, चलन, बँका, नागरी सेवा आणि लष्कर इ. वर निजामाचीच मालकी होती. शेवटचा निजाम मीर उस्मानअली खान याचे पोलिसासह लष्कर ४२००० लष्कर होते. तसेच धर्मांध रझाकारांची संख्या जवळपास २००००० इतकी होती.

## मराठवाडयातील वाचनालये व राष्ट्रीय शाळा :-

हैद्राबाद संस्थानात सामाजिक, शैक्षणिक, भाषिक आणि साहित्यिक क्षेत्रात जागृती करण्यासाठी आ.कृ. वाघमारे यांनी औरंगाबाद येथे बलवंत मोफत वाचनालय स्थापन केले. सन १९२० पासून १९४५ पर्यंत ५० गावात वाचनालये स्थापन केली. या वाचनालयामुळेच भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या आंदोलंनातील म. गांधीच्या विचार व कार्याची ओळख झाली.

तसेच खासगी राष्ट्रीय शाळांमार्फत खेडयांत ज्ञानाचा प्रसार होऊ नये म्हणून निजाम संस्थानाने शाळांना परवानगी नाकारली होती. राष्ट्रीयत्वाची व देशप्रेमाची भावना लोंकात राष्ट्रीय शाळानींच निर्माण केली. तरीही सन १९१६-१७ मध्ये औरंगाबाद येथे सरस्वती भुवन हायस्कुलसह सन १९३५ पर्यत ६ ते ७ खासगी शाळा काढल्या होत्या. तसेच सन १९४१ पर्यंत हिप्परगा, अंबाजोगाई, सेलू, नांदेड, लातूर, उमरगा, बीड, उदगीर येथे शाळा स्थापन झाल्या. थोडक्यात मराठवाडयातील या शाळात शिक्षण घेतलेल्या लोकांत शैक्षणिक, सामाजिक व राजकीय जागृती झाली होती.

### वंदे मातरम चळवळ :-

दिनांक १४ नोव्हेंबर १९३८ रोजी औरंगाबादमधील इंटरमिजिएट कॉलेजच्या वस्तीगृहात गोविंदभाई श्रॉफ यांच्या प्रेरणेने विद्यार्थ्यांनी वंदे मातरम हे गीत म्हटले तेव्हा या गीतावर बंदी घालण्यात आली. वंदे मातरम आंदोलनाचा प्रसार हैद्राबादपर्यंत झाला तेथेही वंदे मातरम म्हणणाऱ्या या विद्यार्थ्यांना वसतिगृहातून काढले आणि त्यांच्यावर उर्दू माध्यमाची सक्ती करण्यात आली. त्यामुळे निजाम संस्थान प्रणित सरकारी शाळा व उस्मानिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी आपली बोलीकडून वंदे मातरम चळवळीतील १२०० विद्यार्थ्यांनी नागपूर विद्यापीठात प्रवेश घेतला. हैद्राबाद संस्थानातील या आंदोलनास म. गांधीसह राष्ट्रीय कॉंग्रेसचा पाठींबा होता. वंदे मातरम गीत संस्थानातील सरकारी कचेरी आणि विद्यापीठात म्हणू नये अशी हैद्राबाद संस्थानाची भुमिका होती. तरीही या संस्थानात प्रचंड जागृती होऊन हैद्राबादच्या स्वातंत्र्य आंदोलनाचा पाया घातला गेला.

### महाराष्ट्र परीषद :-

हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा या मराठी भाषिक प्रदेशामध्ये सन १९३७ पासून महाराष्ट्र परिषद सक्रिय होती. या परिषदेचे पहिले अधिवेशन परतूर येथे सन १९३७ मध्ये गोविंदराव नानल या वकीलाच्या अध्यक्षेतेखाली भरलेल्या अधिवेशनात स्वामी रामानंद तीर्थ (व्यंकटेश भगवान खेडगीकर) आणि बाबासाहेब परांजपे हजर होते. हैद्राबाद संस्थानात झालेल्या हिंदु-मुस्लिम दंग्यांची चौकशी करण्याची मागणी या अधिवेशनात झाली होती. तसेच सन १९४३ च्या अधिवेशनात शिक्षण मातृभाषेतून, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत, शिक्षणावर जनतेचे नियंत्रण असावे, या च अधिवेशनात जबाबदार राज्यपध्दतीचा ठराव पास करण्यात आला होता. महाराष्ट्र परिषदेचे मवाळ स्वरुप मागे पडून ही परिषद जहाल व सरकारविरोधी बनली होती.

### हैद्राबादचा मुक्तिलढा व स्टेट कॉग्रेस :-

हैद्राबाद संस्थानातील जनतेत जाणिवजागृती करण्यासाठी केशवराव कोरटकर व वामनराव नाईक यांनी पुढाकार घेतला असला तरी हैद्राबाद स्टेट कॉग्रेसची स्थापना (सन १९३८) झाल्यांनतर १९४६ ते १९५० या काळात स्वामी रामानंद तीर्थ हे स्टेट कॉग्रेंसचे अध्यक्ष होते. त्यांनी स्टेट कॉग्रेसच्या अध्यक्षपदावरुन हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात सामील करण्यासाठी निजामा विरुध्द आताच लढा दिला पाहिजे असे सांगितले. त्यानुसार या अहिंसक लढयात हैद्राबाद स्टेट कॉग्रेसच्या कार्यकर्त्यासह मराठवाडयातील बहुसंख्य शेतकरी सामील झाले होते. पं. नेहरु आणि सरदार वल्लभभाई पटेलांच्या सल्ल्यानुसार दिनांक ७ ऑगस्ट १९४७ रोजी हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात सामील करण्याचे आणि १५ ऑगस्ट १९४७ हा स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ यांनी केले.

निजामाच्या अनियंत्रीत सत्तने शांततामय आंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न केल्यामुळे हैद्राबाद स्टेट कॉग्रेसने निजामाच्या वर्चस्वातून हैद्राबाद संस्थान मुक्त करण्यासाठी दिनांक ८ ऑगस्ट १९४७ ते ८ ऑगस्ट १९४८ पर्यंत ६०० वकीलांनी न्यायालयावर बहिष्कार टाकला, १४००० विद्यार्थ्यांनी शाळा-कॉलेजवर बहिष्कार टाकला, ३००० पाटील पटवा-यांनी राजीनामे दिले तर २५० खेडयांतील लोकांनी निझामी सत्ता झुगारुन स्वातंत्र्य पुकारले. या स्वातंत्र्य आंदोलनात १०००० लोकांना निझामी सत्तेने तुरुंगात टाकले होते.

### निजामाच्या कारवाया :-

भारतीय संस्थानिकांनी घटनासमितीत सामील व्हावे असे आवाहन दिनांक १८ एप्रिल १९४७ रोजी प्रजापरिषदेच्या व्यासपीठावरुन पंडित नेहरुंनी केले होते. तरीही १२ जून १९४७ रोजी निजामाने आपले संस्थान व सार्वभौम होणार असे जाहीर केले होते. म्हणजेच निजामाने भारतीय संघराज्यात सामील न होता स्वंतत्र राहून ब्रिटीश कॉमनवेल्थचे सभासद रहाण्याची भुमिका घेतली. हैद्राबाद संस्थांच्या स्वतंत्र अस्तित्वाला राष्ट्रीय कॉग्रेंस कदापीही मान्यता देणार नाही असे दिनांक १५ जून १९४७ रोजी कॉगेस कार्यकारणीच्या बैठकीत ठरले होते. तसेच दिनांक ११ जुलै १९४७ रोजी व्हॉइसरॉयने सामील होण्याचा सल्ला देऊनही निजामाने हैद्राबाद संस्थान दिनांक १५ ऑगस्ट १९४७ पुर्वी भारतात सामील केले नाही. दरम्यानच्या काळात निजामाने बॅ. महंमद अली जींनाशी संपर्क साधत भारताशी वाटाघाटी सुरु ठेवल्या होत्या. तसेच निजामाने सरदार पटेलाबरोबर जैसे थे करार केला. तरीही निजामाने भारताच्या विरोधी कारवाया चालु ठेवल्या, दरम्यानच निजामाने पाकिस्तानला २० कोटी रुपये कर्ज दिले. भारतीय चलन हैद्राबाद संस्थानात अवैध ठरविले, रझाकारांनी ७१ खेडी उध्वस्त केली, १४० वेळा सीमा ओलांडून भारतावर आक्रमण केले.

### लष्करी कारवाई :-

मराठवाडयातील बहुसंख्य जनता हैद्राबाद स्टेट कॉग्रेंसच्या नेतृत्वाखाली भारतीय संघराज्यात विलीन होण्याची मागणी करीतच होती. त्यानुसार अहिंसक लढा देणाऱ्या स्टेट कॉग्रेंसने सर्व हालचालींस समर्थपणे तोंड दिले होते. परंतु रझाकार आणि तेथील पोलिसांनी एकत्र येऊन जनतेच्या खाजगी मालमत्ता व जीवितास गंभीर धोका निर्माण केला होता. एप्रिल १९४८ मध्ये व्हॉइसरॉय लॉर्ड मांटबॅटन यांच्या जागी राजगोपालाचारी हे गव्हर्नर जनरल झाले. रझाकारांनी संस्थानातील हिंदुच्या बायक भ्रष्ट करणे, हिंदुचे डोळे फोडणे, त्यांच्या कत्तली करणे आणि घरदार लुटणे असा अत्याचार सुरु केला. निजामाशी तडजोड होण्याची शक्यता नाही त्यामुळे भारत सरकाने हैद्राबाद संस्थानात लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार भारत सरकारने दिनांक १३ सप्टेंबर १९४८ रोजीमेजर जनरल जे.एन. चौधरींच्या नेतृत्वाखाली लष्करी कारवाई केली. दिनांक १७ सप्टेंबर १९४८ निजामाचे लष्कर शरण आले व दिनांक १८ सप्टेंबर १९४८ रोजी संस्थानावर भारतीयलष्कराने ताबा मिळविला. सामिलीकरणावर सहया घेऊन मेजन जनरल जे.एन.चौधरींनी प्रशासकीय यंत्रणा ताब्यात घेतली. पुढे हैद्राबाद संस्थानाचे विभाजन करुन तेलगु भाषिक तेलंगणा, आंध्र प्रदेश, कानडी भाषिक कर्नाटक आणि मराठी भाषिक मराठवाडा महाराष्ट्रास जोडण्यात आला.

### महत्व :-

जगातील स्वातंत्र्यलढयाच्या इतिहासात भारतीय स्वातंत्र्यलढयाचे ज्याप्रमाणे महत्व आहे. तेवढेच महत्व भारतीय स्वातंत्र्यलढयाच्या इतिहासात हैद्राबाद मुक्तिलढयास आहे. कारण ब्रिटिशांच्या आक्रमक धोरण आणि फोडा व झोडा हया कुटील नितिमुळे हैद्राबाद राज्याच्या निजामाने भारतीय संघराज्यात सामील न होता आपले स्वतंत्र अबाधित ठेवले. परंतु व्यापक स्वरुपाचा व प्रदीर्घ लढा दिल्यामुळे हैद्राबाद संस्थान निजामाच्या वर्चस्वातून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात सामील झाले. व्यापक व प्रदीर्घ लढा देणाऱ्या मराठी भाषिक मराठवाडा या प्रदेशातील शोषित व पिडीतांच्या संघर्षाचा हा एक इतिहास आहे. हैद्राबाद मुक्तीलढयाविषयी आजपर्यंत ऐतिहासीक बरेच लिखान झाले. परंतु वस्तुनिष्ठ आणि शास्त्रीय दृष्टीकोनातून इतिहास लेखन झाले नाही. म्हणून मी हैद्राबाद मुक्तीविषयी हा शोधनिबंध लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

### संदर्भ :-


१. वैद्य सुमन व शांता कोठेकर, आधु. भार. इतिहास, चौथी आवृती, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन, २००१ पृ.२५३.
२. उपरोक्त वैद्य सुमन व शांता कोठेकर, पृ. २५४.
३. गाठाळ एस.एस. आधु. महा. इतिहास, प्रथमआवृत्ती, औरंगाबाद, कैलाश पब्लिकेशन्स, २००५, पृ १७७.
४. प्रधान ग. प्र., स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत, प्रथमआवृत्ती, पुणे, साधना प्रकाशन, १९८७, पृ.४१९
५. बागुल एन.के., आधुनिक भारत, औरंगाबाद, आरती प्रकाशन, १९९४, पृ. २८९
६. मोरवंचीकर रा. श्री. आधुनिक भारत, दिवतीय आवृत्ती, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिकेशन्स, १९९६ पृ. २२४.
७. पवार जयसिंगराव, आधु. हिंदु. इतिहस, दिवतीयाआवृत्ती, नागपूर, विद्या. प्रकाशन, पृ. २३४.